# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/ १५२/२०१४

दि. १८ सप्टेंबर २०१४

प्रति
मा.प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

विषय :— रासेयो सप्ताह साजरा करणेबाबत...

महोदय,

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांच्यात सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने स्वावलंबन, चारित्रवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नवीन शिक्षणपद्धतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षापासून २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तत्कालीन शिक्षणमंत्री डॉ. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची घोषणा केली.

त्यानुसार प्रत्येक वर्षी **'२४ सप्टेंबर'** हा दिन **'राष्ट्रीय सेवा योजना दिन'** म्हणून महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येतो. यावर्षी रासेयो दिनानिमित्त दि. २४ ते ३० सप्टेंबर २०१४ दरम्यान **'रासेयो सप्ताह'** महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येणार असून रासेयो दिनामिमित्त वरील सप्ताहात खालील विषयांवर आधारीत विविध कार्यक्रमांचे आयोजन आपण आपल्या महाविद्यालयांमध्ये करावे.

- महिलांवर होणारे अत्याचार – उपाययोजना व जनजागृती
- राष्ट्रीय सेवा योजना व गांधी विचारधारा
- विद्यार्थीनींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण
- विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन मेळावा
- राष्ट्रीय सेवा योजनेत प्रसारमाध्यमांची भूमिका
- महाविद्यालयीन युवकांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याकरीता उपाययोजना
- आजच्या युवकांची व्यसनाधिनता – महाविद्यालयीन आरोग्यजागर

P.T.O.

- पर्यावरणीय असमतोल – आजची समस्या
- मतदान जागृती अभियान
- स्त्री-भ्रुणहत्या – मुलींचा घटता जन्मदर
- आहार/विहार /विचार युवकांचा
- महाविद्यालय परिसर/ दत्तक गावामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

यासारख्या विषयांवर आधारीत कार्यशाळा, पोस्टर प्रदर्शन, वत्कृत्व स्पर्धा, प्रदर्शन, चर्चासत्र, प्रशिक्षण शिबिरे इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करून कार्यशाळेचा अहवाल व फोटो त्वरीत रासेयो कार्यालयास सादर करावा ही विनंती. महाविद्यालयाने सदर कार्यशाळेचा खर्च रासेयो नियमित कार्यक्रमांमधुन करावयाचा आहे.

कळावे.

आपला विश्वासू

प्र. कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना